क्र.ममाअ-१८०८/प्र.क्र.२२१/आस्था-९
ग्राम विकास व जलसंधारण विभाग,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक:- ८ जुलै,२००९

प्रति,
मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव

विभाग :- आरोग्य
दिनांक :- 23 JUL 20..

विषय:- दि. १९ सप्टेंबर,२००६ च्या शासन निर्णयाबाबत
मार्गदर्शन मिळणेबाबत.

संदर्भ:- आपले पत्र क्रमांक आरआर/वैबिल/भरणा/जळ/५६७-६८/०८,
दि. २४.३.२००८

उपरोक्त विषयावरील आपणांकडील संदर्भांकित पत्रास अनुसरुन कळविण्यात येते की, सार्वजनिक आरोग्य विभाग व वैद्यकीय शिक्षण व औषधी द्रव्ये विभागाच्या अखत्यारितील रुग्णालयात आकारण्यात येणा-या सेवा शुल्काचे दर शासन निर्णय, सार्वजनिक आरोग्य विभाग, क्रमांक जिरुफी १०००/प्र.क्र.९०/२०००/आरोग्य-३, दिनांक १० जुलै,२००१ अन्वये निश्चित करण्यात आले आहेत. सदर शासन निर्णयातील मुद्दा क्रमांक- २ नुसार शासकीय कर्मचारी व त्यांच्यावर अवलंबून असलेले कुटुंबिय यांना विनाशुल्क वैद्यकीय उपचाराची सवलत देण्यात आली आहे. त्यामुळे वैद्यकीय खर्चाच्या प्रतिपूर्तीकरिता प्रमाणपत्र मिळण्यासाठी ३% शुल्क आकारण्याची आवश्यकता नाही.

उपरोक्त अभिप्राय सार्वजनिक आरोग्य विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक-११, दिनांक ५.५.२००९ अन्वये दिलेल्या सहमतीनुसार कळविण्यात येत आहेत.

( शि.मा.तभाने )
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन.

प्रत,
सह सचिव, सार्वजनिक आरोग्य विभाग (कार्या.-आ-२) मंत्रालय, मुंबई-३२

मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, जळगांव.

C:\lotus work\wordpro\Mahiticha Aadhikar CR-221-08-D.K.Wankhede.lwp



Scanned with CamScanner